# गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास
## खंड पहिला
## (आरंभ ते १९६१)

संपादक
डॉ. वि. बा. प्रभुदेसाई
प्रा. रवीन्द्र घवी

। वर्धत सकळ मंगळी ।

गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन

**गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला**
**(आरंभ ते १९६१)**


| | | |
|---|---|---|
| आवृत्ती | - | पहिली, २००३ |
| प्रकाशन क्र. | - | ५६ |
| प्रकाशक | - | ©अध्यक्ष, गोमंतक मराठी अकादमी,<br>राणी प्रमिला आर्केड, १८ जून मार्ग,<br>पणजी, गोवा, ४०३००१. |
| मुखपृष्ठ | - | संजय हरमलकर |
| अक्षरजुळणी आणि मुद्रण | - | अक्षर रचना,<br>टी-२, तिसरा मजला, आताइद बिल्डिंग,<br>शिव सागर हॉटेलच्या मागे,<br>एम्. जी. रोड, पणजी - गोवा.<br>दूरध्वनी क्र. २४२०४८० |
| किंमत | - | रुपये ४७५.०० |

ह्या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी गोवा शासनाचे अनुदान मिळाले आहे.

# वैचारिक साहित्य

**डॉ. सोमनाथ कोमरपंत**

मुक्तिपूर्व गोमंतकातील वैचारिक साहित्याचा मागोवा घेताना प्राचीन काळातील पुरावे शोधणे दुरापास्त आहे. गोव्याने अनेक राजवटी पाहिल्या. पोर्तुगीजांसारख्या अमानुष राजवटीला टक्कर देत गोमंतकीयांनी आपले भारतीयत्व अभंग ठेवले. प्राचीन काळापासून मराठीचा समृद्ध वारसा गोमंतकाला लाभला आहे. संत आणि पंडित परंपरेमुळे येथील अनेक पिढ्यांचे भावनिक व वैचारिक पोषण झाले. कृष्णदास श्यामा या कवीने पोर्तुगीजांनी गोवा काबीज केल्यावर अवघ्या १६ वर्षांनंतर 'श्रीकृष्णचरित्रकथा' हा विविध रसांचा परिपोष करणारा उत्तम काव्यग्रंथ लिहिला. गद्यवाङ्मयापेक्षा पद्यवाङ्मयाची परंपरा येथे होती. संतकविपरंपरेचे पालन आणि अनुकरण या भूमीत होत असे. पंडिती वळणाची कविता लिहिली जात असे. ज्ञानेश्वर, नामदेव, मुकुंदराज इ. कवींच्या काव्याचा व्यासंग येथे होत असे. मुक्तेश्वर, रामदास, तुकाराम, वामनपंडित आणि मोरोपंत यांच्या काव्याचा संस्कार येथील जनमानसावर होत असे. भक्ती-मुक्तीच्या प्रेरणेनेच नव्हे; तर शक्तीपाताच्या कालखंडात मानसिक उभारी देण्याचे कार्य या वाङ्मयाने केले. या अंत:ज्योतीच्या प्रकाशात गोमंतकीयांना आपल्या उन्नयनाचा मार्ग दिसला. नेमकी हिच बाब पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांना सलत होती. धर्मप्रसाराच्या निमित्ताने त्यांनी येथील मौलिक ग्रंथसंपदा नष्ट केली.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून गोमंतकीय कवींनी भक्तिरसात्मक काव्याची परंपरा अव्याहतपणे चालू ठेवली. सामाजिक हेतू मनात बाळगून रामचंद्र ऊर्फ दादा वैद्य यांनी काव्य निर्मिती केली. रामचंद्र वामन नाईक करंडेशास्त्री यांनी समाजजागृतिपर काव्यलेखन केले. व्युत्पन्नता आणि निरीक्षणशक्ती यांचा स्वरमेळ त्यात होता. वि. का. प्रियोळकर यांनी 'देमांदमाहात्म्य' या आपल्या विडंबनपर काव्यातून कज्जेखोरपणावर प्रकाश टाकला. एका परीने समाजातील दोषस्थलांवर उपहासात्मक शैलीतून भाष्य करणे हा या काव्याचा हेतू आहे. विसाव्या शतकातील वैचारिकतेची आणि समाजसन्मुखतेची गंगोत्री म्हणून या काव्यानिर्मितीकडे पाहता येईल.

या पार्श्वभूमीवर गोमंतकातील वैचारिक गद्यवाङ्मयाचा परामर्श घ्यायचा आहे.

गोमंतकातील गद्य वाङ्मयाची परंपरा महाराष्ट्रातील गद्य वाङमयपरंपरेशी समांतर आहे. शतका-दीड शतकापलीकडचे गद्य वाङ्मय उपलब्ध नाही. श्रीमहेश्वरभट्ट सुखठणकर यांचे गद्य लेखन १७५०च्या आसपासचे आहे. या संस्कृततज्ज्ञाने त्या काळात अमरकोशाची मराठी टीका लिहिली. त्यानंतर 'गीतगोविंद' या नितांत मधूर काव्यावर मराठीतून टीका लिहिली. वेदांत विषयाची मराठी वाचकांना ओळख करून देणाऱ्या उद्देशाने 'वाक्सुधे'वर 'पानपात्रचषक' नावाची टीका लिहिली. गोमंतकातील गद्यसाहित्याचे स्वतंत्र अस्तित्व आणि परंपरा म्हणून महेश्वरभट्टांच्या या प्रयत्नांकडे अंगुलिनिर्देश करता येईल. यानंतर लगोलग निर्माण झालेले गद्यसाहित्य उपलब्ध नाही.

मराठी साहित्याविषयी ममत्व बाळगून आणि झीज सोसून बारांव द् कुंभारजुवा (कुंभारजुव्याचे बॅरन) या उदारमनस्क ख्रिश्चन सद्गृहस्थाने मराठी छापखाना स्वखर्चाने सुरू करून 'रामविजय' सारखे ग्रंथ प्रसिद्ध केले. मराठी शाळा सुरू करण्यास सरकारला भाग पाडले. मराठी बोलण्याचा सराव व्हावा, संस्कृतचे अध्ययन निष्ठेने व्हावे यासाठी ते सतत कार्यरत राहिले. 'देशसुधारणेच्छु' हे नियतकालिक सुरू केले. मराठी भाषेचे पायाभूत स्वरूपाचे कार्य करणारे कार्यकर्ते म्हणून गौरवाने त्यांचा उल्लेख करावा लागेल. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस त्यांनी जी पूर्वपीठिका निर्माण केली तिचा लाभ विसाव्या शतकाच्या प्रारंभी झालेल्या प्रबोधनपर्वास निश्चितपणे झाला असे म्हणावे लागेल.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला रामचंद्र वामन नाईक करंडेशास्त्री यांनी कुंभारजुवे येथे 'सत्संग' मासिक सुरू केले. या मासिकाच्या छत्राखाली निष्ठावंत आणि ज्वलंत विचारांच्या माणसांची मांदियाळी एकत्र आली. आत्मशोधाच्या प्रक्रियेचा हा शुभारंभ होता. 'स्तवनार्थ निबंध' या व्याजोक्तिपूर्ण निबंधात एक पोर्तुगीज न्यायाधिकाऱ्याच्या हिंदु धर्माच्या आणि चालिरीतींच्या कुचेष्टेला प्रत्युत्तर गंगाराम प्रभु सिनारी यांनी पोर्तुगीज भाषेत दिले होते. त्याचा मराठी तर्जुमा प्रसिद्ध झाला होता. आज या गोष्टीचे महत्त्व वाटत नसले तरी तो प्रतिकूल काळ लक्षात घेता स्वाभिमानाचा स्फुल्लिंग निर्माण झाल्याची ती निशाणी होती. 'सत्संग' मासिकाने केलेल्या दैदीप्यमान कार्याचा आलेख नियतकालिकांचा परामर्श घेताना येईलच. पण आवर्जून उल्लेख करावा लागेल तो दत्ताराम जगन्नाथ वरदे बोरकर यांच्या 'अवताररहस्य' या पुस्तकाचा. ही लेखमाला 'सत्संग' मासिकातून प्रसिद्ध होत असे. या मालिकेतून प्रच्छन्नपणे आपल्यावर टीका होत आहे, असे ब्रिटीश सरकारला वाटले व ब्रिटीश हिंदुस्थानात या नियतकालिकावर बंदी घालण्यात आली. पोर्तुगीज सरकारनेही त्यावर बंदी घालावी असे सुचविण्यात आले. गोमंतकीयांच्या स्वातंत्र्याकांक्षेचा उच्चार त्या मालिकेतून रूपकात्मक शैलीतून करण्यात आलेला

होता. शि. म. परांजपे यांच्या लेखनशैलीशी नाते सांगणारी ही शैली होती. काव्यमय कल्पना, निर्भीड विवेचन आणि धारदार लेखणी यांचा त्रिवणी संगम त्या लेखनात झालेला होता.

सदाशिव रावजी गडणीस यांनी 'खरे ज्ञान' आणि 'द्यूत गुणादर्श' ही पुस्तके लिहिली. तत्कालिन सामाजिक दस्तऐवज आणि भाषावैशिष्टये या दृष्टीने या पुस्तकांचे महत्त्व आहे. क. ला. शिवेस्कर आणि पु. गो. साळकर यांनी या कालखंडात विचारप्रवर्तनाचे कार्य आपल्या लेखनातून केले. या काळात आरोग्यविषयक, ऐतिहासिक संशोधनपर आणि चरित्रात्मक वाङ्मय विपुल प्रमाणात लिहिले गेले, पण वैचारिक वाङ्मयाची वानवा होती असे म्हटले तरी चालेल. याची कारणे तत्कालिन सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीशी निगडित आहेत.

त्यातही गोमंतकीय समाजजीवनात परिवर्तन झाले ते पोर्तुगालमध्ये झालेल्या सत्ताबदलामुळे. ५ ऑक्टोबर १९१० मध्ये तिथे प्रजासत्ताक पद्धती सुरू झाली आणि गोमंतकीय सामाजजीवनातील बंधने शिथिल झाली. याविषयी यशवंत सूर्यराव सरदेसाई ऊर्फ भाई देसाई म्हणतात.

''हिंदु समाजाला जागृत होण्यासारखी आणखी एक घटना १९१० साली घडून आली. ती लोकसत्तेची स्थापना होय. यामुळे धार्मिक स्वातंत्र्य ताबडतोब मिळाले व त्याचा परिणाम इतका झाला की बंधनांतून मोकळ्या झालेल्या मनाला जी सुखाची भावना प्राप्त होते ती हिंदु समाजात उत्पन्न झाली. आता आपल्या कर्तबगारीस वाव मिळेल असे वाटून त्याला आत्मविश्वास आलां व धर्म, शिक्षण व सरकारदरबार यांत मिळालेल्या समतेचा हिंदुसमाजाने पूर्ण उपयोग करून घेतला.''

१९१० नंतर सामाजिक आणि सांस्कृतिक अभिसरणाची प्रक्रिया गोमंतकात सुरू झाली. सामाजिक व शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या. वाचनालये सुरू झाली. व्याख्यानमाला सुरू झाल्या. या सर्व कार्यात 'पथ्यबोध' आणि 'सत्संग' या नियतकालिकांचे कर्तृत्व ऐतिहासिक आहे.

आणखी एक लक्षणीय बाब म्हणजे गोमंतकाचा महाराष्ट्राशी आंतरिक संबंध आल्यांमुळे गोमंतकातील लेखकवर्ग महाराष्ट्रातील नियतकालिकांत लिहायला लागला. महाराष्ट्रातील लेखकवर्ग गोमंतकातील नियतकालिकांतून आपले लेखन करू लागला. भाषिक व सांस्कृतिक एकात्मतेमुळे विचारांत आदानप्रदान होऊ लागले. येथील समाजाच्या जीवनानुभवाच्या कक्षा वाढायला मदत झाली. टिळक, आगरकर, परांजपे यांच्या कर्तृत्वाचा, लेखणीचा प्रभाव येथील जनमानसावर होता. सुब्राव रामकृष्ण सामंत यांचा 'गोमंतकीय हिंदी लोक आणि फिरंगी संस्कृती' हा निबंध त्यातील ओजस्वितेमुळे आणि उपरोधिक शैलीमुळे त्या काळात गाजला. 'गोवा

हिंदु क्लब' यासारख्या संघटना येथे होत्या. डॉ. पुरुषोत्तम वामन शिरगावकर यांसारखे प्रागतिक विचारांचे प्रज्ञावंत तत्कालिन तरुणांचे नेतृत्व करीत होते. केसरी, काळ, करमणूक, विविधज्ञानविस्तार मनोरंजन या नियतकालिकांचे चोखंदळपणे वाचन त्या काळात चालत असे. शांबाराव सरदेसाई, सदाशिव शेणवी सुखठणकर, भिमाजी मुकुंदराव देशपांडे, पुरुषोत्तम भोबे काकुले वगैरे मंडळी वरचेवर बौध्दिक चर्चा करीत. कुंभारजुव्याचे फटबा बाबुराव केंकरे यांच्या अध्यक्षेतेखाली होणाऱ्या सभात स्वदेशी मालाचा पुरस्कार केला जाई. स्वदेशाभिमान आणि स्वातंत्र्याच्या संकल्पनेविषयी व्याख्याने होत असत. आपला उज्ज्वल इतिहास, आपली संस्कृती, आपला विशुद्ध नीतिधर्म आणि व्यापक राष्ट्रवाद यांविषयीचे प्रबोधन अशा व्याख्यानाव्दारा होत असे. तरुणांपैकी जिवाजी दत्तु महात्मे, रामचंद्र सदाशिव वागळे, शिवराम बळवंतराव देशपांडे, रामकृष्ण नाईक, बाळकृष्ण वामन सावर्डेकर, सावळोबा व श्रीराम पार्सेकर हे बंधुद्वय हे या चळवळीत हिरीरीने भाग घेत. शांबाराव सरदेसाई हे विचावंत तरूण म्हणून नावाजलेले होते. हिंदु धर्म आणि सुधारणा, ब्राह्मण आणि त्याची विद्या इ. ग्रंथांवर त्यांची भाष्ये चालत. टिळक, आगरकर, रानडे, भांडारकर यांच्या विचारप्रणालीतील फरक ते समजावून सांगत.

स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, समुद्रपर्यटन, धर्मगुरूंची कर्तव्ये, अनिष्ट चालीरीती, व्यसनाची प्रतिष्ठा आणि परवशतेची मीमांस इ. विषयांवर विचारमंथन करून त्यांचे फलित जनतेसमोर ठेवण्याचे कार्य तत्कालिन प्रज्ञावंतांनी केले. यामध्ये यशवंत सूर्यराव सरदेसाई, दत्तात्रय व्यंकटेश पै, बा. वा. सावर्डेकर, गो. पुं. हेगडेदेसाई, शिवा फटू पै आंगले, लक्ष्मीकांत भेंब्रे, व्यं. वि. वैद्य व रघुनाथ ग. तळवडकर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.


यशवंत सूर्यराव सरदेसाई तथा भाई देसाई

यशवंत सूर्यराव सरदेसाई ऊर्फ भाई देसाई हे संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक, प्रवचनकार आणि भगवद्भक्त म्हणून गोमंतकात आणि मराठी साहित्य जगतात ज्ञात असले तरी तेवढ्यापुरते त्यांचे कार्य मर्यादित नाही. सार्वजनिक जीवनात ते हिरीरीने भाग घेत असत. वेडगळ धार्मिक कल्पना, अंधश्रद्धा आणि समाजातील व्यसनाधीनता यांवर त्यांनी शरसंधान केले. गोमंतकात राहून महाराष्ट्रातील वाङ्मयीन नियतकालिकांतून शैलीदार लेखन करणारे साहित्यिक आणि पुरोगामी विचारसरणीचे ते समाजधुरीण होते. यशवंतराव सूर्यराव सरदेसाई (भाई देसाई ) स्मारक ग्रंथामध्ये त्यांचे वैचारिक लेखन (१९६५) समाविष्ट करण्यात आले. त्यांचे हे लेखन

१९५३ पूर्वीचे असल्यामुळे त्याचा परामर्श येथे सारांशरूपाने घेणे आवश्यक आहे. संतवाङ्मयाचे त्यांनी सखोल अवगाहन केलेले असल्यामुळे त्यांच्या या लेखनात संतांच्या चरित्राचे आणि कर्तृत्वाचे दर्शन घडविणारे लेख अधिक्याने आढळतात. श्री ज्ञानेश्वर महाराज व श्रीनामदेव महाराज आणि 'श्री एकनाथ महाराज' या लेखांतून त्यांनी अनुक्रमे ज्ञानेश्वर, नामदेव व एकनाथ या श्रेष्ठ संतांच्या जीवनकार्याचा आणि वाङ्मयाचा सरस रमणीय परिचय करून दिलेला आहे. लौकिक चरित्रात न रमता मानवजातीला शाश्वत तत्त्वज्ञान देणाऱ्या संतांच्या अंतरंगदर्शनात त्यांची प्रतिभा रमलेली आहे. आशयसामर्थ्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केलेले आहे. तुकारामांचे चरित्र आणि त्यांची अभंगगाथा हा भाई देसाई यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे तुकारामांवर 'श्री तुकाराम महाराज', 'तुकोबांचे रामराज्य', 'तुका झालासे कळस' आणि 'शेवटचा गोड दिवस' असे चार लेख लिहिलेले आहेत. संतवाङ्मयाकडे भाई देसाई आधुनिक दृष्टिकोनातून पाहतात. तुकारामांचा महत्त्वपूर्ण आत्मचरित्रपर अभंग उद्‌धृत करून अम्लान शैलीत निरुपण करतात. वरील अभंग तुकोबांच्या साऱ्या चरित्राचे बीजरूप निवेदन होय... ''संतांची वाणी सूत्रबद्ध असते. त्यांचे शब्द लहान असतात, पण त्यातून व्यापक अर्थ जन्म घेतात ! त्यांची वाक्ये मोकळी दिसतात, पण त्यांतून गहन सिध्दांत साठविलेले असतात. त्यांचे बोलणे वाटते सोपे; पण त्यांतून अनेक दडलेली कोडी बाहेर येत असतात ! म्हणून याचा अभ्यास विशेषत्वाने करावा लागतो. अनुभवी डोळस पुरुषाचा आश्रय मिळवून हा संतबोध समजून घ्यावा लागतो. एकच शब्द पण प्रापंचिक, पंडित व हरिभक्त हे त्याचा उपयोग आणि अर्थ तीन प्रकारे करतील ! प्रापंचिकाचे शब्द बदलतात, पंडिताचे अर्थ बदलतात. संतांच्या तोंडातून निघालेले शब्द आणि त्याचे अर्थ अबाधित असतात, संदेहातीत असतात, त्रिकालातीत असतात !''

भाई देसाई यांच्या निवेदन शैलीची ही झलक आहे. याच पद्धतीने त्यांनी श्री संत निळोबाराय आणि गोमंतकातील श्रेष्ठ संत श्री सोहिरोबानाथ महाराज यांचा परिचय करून दिलेला आहे. पूर्वसूरींचा वैचारिक वारसा त्यांनी अभ्यासपूर्ण रीतीने वाचकांसमोर ठेवला आहे. 'आदर्श लोकनायक' हा श्रीकृष्णाच्या चरित्रावर आधारलेला लेख आहे.

येथपर्यंतचे त्यांचे लेख वाङ्मयाधिष्ठीत आहेत. हा लेख सामाजिक निरीक्षणावर आधारलेला आहे. 'गोमंतका संघटीत हो !', 'गोमंतकाचा बंडखोरपणा', 'गोमंतकाचा अभिमान', 'गोमंतक स्वतंत्र झालाच पाहिजे !', 'गोमंतकाचे आकर्षण', 'गोमंतकाचे वैशिष्ट्य' आणि 'पंचवीस वर्षांचे गोमंतक' हे गोव्याविषयीच्या ममत्वातून साकार झालेले आहेत. गोमंतकीयांच्या जाज्वल्य निष्ठांचे हुंकार आणि स्वातंत्र्याकांक्षेचे उद्‌गार भाई देसाई यांच्या तेजस्वी लेखणीतून दृग्गोचर होतात.

गोमंतकीयांनी मराठी भाषेच्या समृद्धीसाठी केलेल्या प्रयत्नांविषयीचे विवेचन दोन लेखांमधून भाई देसाईंनी केलेले आहे. गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या २ऱ्या अधिवेशनात त्यांनी केलेले सागताध्यक्षाचे भाषण येथे समाविष्ट केलेले आहे. 'आमची देवालये' या मालिकेतून त्यांनी गोमंतकातील मंदिरांचा परिचय करून दिलेला आहे. त्यामधून त्यांच्या संशोधक वृत्तीचा प्रत्यय येतो. त्यांच्या आत्मचरित्रपर लेखांतून तत्कालीन गोमंतकीय समाजजीवनातील बारकाव्यांचे दर्शन घडते. शिवाय 'डॉ. पुरुषोत्तम वामन शिरगावकर', 'ब्रह्मर्षी धर्मानंद कोसंबी' आणि 'न्या. काशीनाथ त्र्यंबक तेलंग' या चरित्रपर लेखांतून गोमंतकातील श्रेष्ठ कृतिशील प्रज्ञावंतांचे दर्शन घडते. 'एकीबेकी' आणि 'लोकसत्ता' या दोन लेखांना सामाजिक दस्तऐवज म्हणून महत्त्व आहे. भाई देसाई यांच्या चतुरस्त्र लेखनातून श्रेष्ठ प्रबोधनकार आणि विचारवंत अशी प्रतिमा निर्माण होते.

दत्तात्रय व्यंकटेश पै हे झुंजार पत्रकार, पुरोगामी विचारवंत आणि चिकित्सक साहित्यिक होते. त्यांची देशनिष्ठा प्रखर होती. स्वत्वरक्षणासाठी आणि भारतीय परंपरेच्या रक्षणासाठी ध्येयाने प्रेरित होऊन ते कार्य करीत होते. गोव्यातील अचेतन हिंदु समाजात त्यांना जागृती घडवून आणायची होती. म्हणून मडगाव येथे 'हिंदु' हे साप्ताहिक सुरू केले. 'हिंदु विद्यार्थी गृह' ही शिक्षणसंस्थाही त्यांनी सुरू केली. मराठी भाषेवरील त्यांची निष्ठा जाज्ज्वल्य स्वरूपाची होती. त्यांची प्रागतिक विचारसरणी तत्कालीन समाजाच्या पचनी पडणारी नव्हती. त्यांची 'अरण्यपंडित' या उपाधीने अवहेलना करण्यात आली. तरी ते ध्येयमार्गावरून विचलित झाले नाहीत. वास्को डी गामाच्या हिंदुस्थानच्या जलमार्गाच्या चतु:शताब्दीचा गोव्यात सोहळा झाला. तेव्हा दत्तात्रय व्यंकटेश पै यांनी हिंदू साप्ताहिकात 'गामाचे गुणगान' हा परखड अग्रलेख लिहून या सोहळ्याला निक्षून विरोध केला. तेव्हा देशद्रोहाच्या आरोपाखाली 'हिंदु' साप्ताहिकावर बंदी घातली आणि त्यांचे मामा सुकेरकर यांना कारावासात पाठविले.

दत्तात्रय व्यंकटेश पै यांच्या 'जळता गोमंतक' या पुस्तकात गोमंतकातील तत्कालीन राजकीय परिस्थितीचे, सामाजिक व सांस्कृतिक अवनतीचे चित्र रेखाटले आहे. मुंबई येथे १९४५ मध्ये भरलेल्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनात स्वागताध्यक्ष या नात्याने केलेल्या त्यांच्या भाषणातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणविशेषांचे आणि शैलीचे दर्शन घडते. गोमंतकातील मराठी भाषेच्या दु:स्थितीचे चित्र त्यांनी त्यात पोटतिडीकीने रेखाटले आहे. 'हिंदु' साप्ताहिकाच्या कार्याचा व दत्तात्रय व्यंकटेश पै यांच्या व्यक्तिमत्त्वाचा यथार्थ गौरव गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून वि. स. खांडेकर, ज. वि. कामत आणि ना. ग. गोरे यांनी केलेला आहे.



बाळकृष्ण वा. सावर्डेकर

प्रा. बाळकृष्ण वामन सावर्डेकर हे मराठीचे जाज्वल्य अभिमानी. आयुष्यभर मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, प्रसारासाठी ते कार्यरत राहिले आणि आपल्या लेखणीचा वापर केला. 'गोमंतक परिचय' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्धच आहे. येथील मराठीची कैफियत त्यांनी प्रभावी शब्दांत मांडलेली आहे. यात साक्षेपी वृत्तीने गोमंतकाचे बहिरंग आणि अंतरंग यांचा परिचय त्यांनी करून दिलेला आहे. भौगोलिक माहितीबरोबर गोमंतकाची ऐतिहासिक परंपरा, राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती, प्रेक्षणीय स्थळे आणि मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी गोमंतकात घडलेले कार्य या विषयांसंबंधीची माहिती या ग्रंथात देण्यात आलेली आहे. 'गोमंतक परिचय' या ग्रंथाला संदर्भमूल्य प्राप्त झालेले आहे.

'गोमंतकाची भाषा' या लेखांमधून बा. वा. सावर्डेकर यांच्या निस्सीम मराठीप्रेमाचे दर्शन घडते. मराठीच्या आदिकालापासून गोमंतकात मराठी कशी अस्तित्वात होती हे त्यांनी पुराव्यानिशी पटवून दिलेले आहे. अगदी प्राचीन काळापासून गोमंतकात नव्हे तर त्याच्या उत्तरेस वेंगुर्ले, सावंतवाडी, याच्यापुढे मालवण, रत्नागिरी, पूर्वेस लोंढा, सुपा किंवा दक्षिणेस माजाळी-शिवेश्वर-कुमठा पलीकडेसुद्धा कोकणी भाषकांच्या बाबतीत मराठी भाषा हीच प्रमाणित देशभाषेचा अधिकार निर्वेधपणे उपभोगीत आलेली आहे. असे नि:संदिग्ध प्रतिपादन त्यांनी केलेले आहे. पोर्तुगीज राजवटीत मराठी भाषेला मान्यता कशी मिळाली हे त्यांनी इतिहासातील दाखले देऊन सांगितले आहे.

गोमंतकीय समाजाच्या भौतिक समृद्धीसाठी, सांस्कृतिक उन्नयनासाठी आणि कला वाङ्मयविषयक अभिरुची संपन्न करण्यासाठी मराठी भाषेने जे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. याचा परामर्श प्रा. सावर्डेकरांनी घेतलेला आहे. मराठी साहित्याच्या भांडारात गोमंतकीयांनी जी अभिमानास्पद कामगिरी बजावली आहे तिचा त्यांनी आवर्जून उल्लेख केलेला आहे. मराठी जनमानसाकडून गोमंतकीयांच्या या कार्याला मान्यता मिळालेली आहे. गोमंतकावर मराठी भाषा कुणी लादलेली नाही. ती उपरी नाही. येथील हजारो बालकांना जीवनदायी शिक्षणामृत पाजणाऱ्या मराठी भाषेशी गोमंतकाचे अतूट नाते आहे, असे विचार प्रा. बा. वा. सावर्डेकर यांनी मांडलेले आहेत.

समाजसुधारणेच्या इतर अंगांकडे प्रा. बा. वा. सावर्डेकर यांनी लक्ष पुरवले. र. धों. कर्वे यांचे 'समाजस्वास्थ' हे नियतकालिक उघडपणे वाचणारे आणि त्यातील

विचार समाजात प्रसृत करणारे ते कृतिशील विचारवंत होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी गाय हा उपयुक्त पशू आहे हा हिंदू समाजाला धक्का देणारा विचार बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेतून मांडला; पण त्यापूर्वीच सावर्डेकरांनी हे विचार गोमंतकाच्या भूमीत रूजविण्याचा प्रयत्न केला. गोव्याच्या समकालीन सार्वजनिक जीवनात उठून दिसणारे ते व्यक्तिमत्त्व होते. पण त्यासाठी त्यांना उपहास सहन करावा लागला. प्रागतिक संघ व गावड्यांचे शुद्धिकरण इ. सामाजिक चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्यांच्या विचारांना सतत कृतीची जोड मिळत गेली.

लोकमान्य टिळकांची प्रखर राष्ट्रवादी वृत्ती आणि गोपाळ गणेश आगरकर यांचा समाजसुधारणावादी दृष्टिकोन गो. पुं. हेगडे देसाई यांच्या व्यक्तिमत्त्वात सामावलेला आहे. त्यांच्यावर विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर आणि शि. म. परांजपे या थोर पत्रपंडितांचा प्रभाव पडलेला होता. गोमंतकातील तत्कालीन राजकीय, समाजिक, आर्थिक अवनतावस्थेचा त्यांच्या मनावर परिणाम झालेला होता. डॉ. पु. वा. शिरगावकर यांच्या 'प्रभात' या नियतकालिकातील पोर्तुगीज विभागाची जबाबदारी समर्थतेने ते पेलत होते. स्वतंत्र प्रज्ञेच्या गो. पुं. हेगडे देसाई यांनी ६ नोव्हेंबर १९१२ मध्ये मराठी व पोर्तुगीज द्विसाप्ताहिक सुरू करण्याची अंत:प्रेरणा झाली. 'भारत' पत्राने आपल्या छत्तीस वर्षांच्या खडतर साधनेतून तेजोमय इतिहास घडविला. केवळ गोमंतकाच्या नव्हे तर भारताच्या इतिहासात स्वातंत्र्यसंग्रामातील हे रोमहर्षक पर्व. हेगडे देसाई यांचे गोमंतकाच्या सर्वंकष लढ्यासाठी आपण स्वीकारलेल्या अग्निदिव्यासाठी समर्पित असे जीवन पाहता हे व्यक्तिमत्त्व दुर्मिळ वाटते. भारतकारांचा बुद्धिप्रामाण्यवाद, द्रष्टेपण आणि समाजाच्या सुखदु:खाशी समरस होण्याची त्यांची ध्येयवादी जीवनदृष्टी पाहताना आपण नतमस्तक होतो. 'भारत' मधील अग्रलेखात त्यांच्या ज्वलंत जीवननिष्ठेचे मूर्तिमंत प्रतिबिंब दिसते. या द्विसाप्ताहिकातील बहुतांश लेखन हेगडे देसाई यांचेच असायचे. त्यांच्या अग्रलेखांच्या संकलनाचे कार्य कष्टपूर्वक शशिकांत नार्वेकर यांनी केले. 'गोमंतक मराठी अकादमी'ने दोन खंडात ते प्रकाशित केले. या कार्याच्या परिपूर्तीसाठी प्रा. रवींद्र घवी आणि परेश प्रभू यांनी मौलिक सहकार्य दिले. वाङ्मयेतिहासाच्या नियतकालिकांच्या कार्याचा मागोवा घेताना त्याचा विचार होणार असल्याकारणाने भारतकारांच्या वैचारिक वैविध्याचा आणि सामर्थ्याचा सूत्रमय निर्देश इथे करायचा आहे.

'जनसेवा हीच ईश्वरसेवा ! त्याविण दुसरा धर्म न ठावा' हे 'भारत'चे ब्रीदवाक्य होते. 'भारत'कार हेगडे देसाई यांच्या जीवनाचा मूलमंत्र होता. आयुष्यातील शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी याच गोष्टीचा ध्यास घेतला व ते सार्थकी लावले. त्यांच्या अग्रलेखांच्या पहिल्या खंडात राजकीय व सामाजिक विषयांवरचे अग्रलेख आहेत

आणि दुसऱ्या खंडात धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, भाषिक, आर्थिक आणि जीवनातील विविधांगी पैलूविषयीचे संकीर्ण स्वरूपाचे लेख आहेत. असिधाराव्रत स्वीकारलेल्या जाज्वल्य निष्ठेच्या पत्रकाराचे अंतरीचे बोल भारताचे ''हृदगत'' या शीर्षकाखाली प्रकट झाले आहेत. गोमंतकाच्या पारतंत्र्यातील प्रदीर्घ पट या अग्रलेखांतून दृग्गोचर होतो. सामाजिक दस्तऐवज एवढेच या अग्रलेखांचे महत्त्व नसून जनसामान्यांच्या सुखदुःखांकडे, जागरूकतेने व कनवाळूपणाने पाहणारे हेगडे देसाई यांचे पारदर्शी मन या अग्रलेखांतून दृष्टोत्पत्तीस येते. 'भारत'कारांचा आत्मा सतत अस्वस्थ असायचा. त्या अस्वस्थतेचे हुंकार या अग्रलेखांत आढळतात. या समाजमनस्क प्रज्ञावंताच्या बुध्दीचा आवाका किती व्यापक होता आणि मूलभूत चिंतनाची सखोलता किती होती याचा प्रत्यय या लेखातून येतो. प्रसंगविशेषी पल्लेदार; पण एरव्ही हृदयाचा ठाव घेणारी ही सहजसुलभ शैली आहे, याचा प्रत्यय या अग्रलेखांतून येतो.

या कालखंडातील गोमंतकातील श्रेष्ठ प्रज्ञावंत म्हणून आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे नाव घेतले जाते. गोमंतकाने देशाला जी मोठी माणसे दिली त्यातील धर्मानंदाचा क्रम बराच वरचा लागेल. ते प्रकांड पंडित होते. बौध्द धर्माचे उपासक होते. गतिमान काळात बौद्ध धर्माकडे बुद्धीवादी व विज्ञाननिष्ठ प्रेरणांनी कसे पाहता येईल याचा अहर्निश निदिध्यास त्यांनी बाळगला. नवा अन्वयार्थ लावला. त्यांची जीवनसाधना ही खडतर जीवनाची साधना होती. अखंड आयुष्यात त्यांनी ज्ञानमार्ग पत्करला. ते वाङ्मयविशारद, बौद्ध तत्त्वज्ञानाचे मर्मज्ञ टीकाकार गणले जातात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी ज्ञान मिळविले. ते जगाला देण्यासाठी अखंडितपणे परिक्रमा केली.

धर्मानंदांनी आपल्या ग्रंथनिर्मितीतून जी विचारसंपदा जगाला दिली तिचे यथार्थ मूल्यमापन करताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात:

''आचार्य धर्मानंदांनी बुद्धचरित्र व बौद्धधर्म यांचा वाङ्मयीन पाया घातला, त्यापायावर इमारत उभारायचे कार्य थोर दलित नेते डॉ. बोधिसत्व बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केले; त्यांच्या कार्यास धर्मानंदांचा आधार मिळाला. धर्मानंदांनी लिहून प्रसिद्ध केलेले साहित्य हाच तो आधार होय. चालू शतक म्हणजे धर्मानंदांचे दुसरे शतक होय. हा धर्मानंदांचा भविष्यकाल होय. विचार हा संस्कृतीचा आधार असतो. धर्मानंदांच्या साहित्यातील विचारांचा गाभा त्रिकालाबाधित व अजरामरही आहे.... त्या वैचारिक साहित्याच्या पाठीमागे फार मोठा त्याग आहे. त्या त्यागातून त्या साहित्याचे भव्य यश प्रकट झाले आहे. ज्या उच्च विचारांच्या पाठीमागे महान त्याग असतो, ते विचार अधिक प्रभाविपणे दीर्घकालपर्यंत मोठी प्रेरणा देत राहतात. म्हणून असे म्हणता येते की धर्मानंदांना फार मोठा भविष्यकाळ आहे.''

धर्मानंद कोसंबी यांनी बौद्ध धर्म आणि संघ (१९१०), बुद्ध-लीला-सार-संग्रह (१९१४), लघुपाठ (१९१७), समाधिमार्ग (१९२५), बौद्ध संघाचा परिचय (१९२६), पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म (१९४१) इ. पुस्तके लिहिली. 'जातक कथा, भा. १'मध्ये अष्टकथांतील ९५ कथा मराठीत संग्रहित केल्या. 'विशुद्धिमार्ग', 'सुत्तनिपात', 'बोधिचर्यावतार', 'अभिधर्मार्थ संग्रह' आणि 'धम्मपद' इ. अनुवादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. या साऱ्या ग्रंथनिर्मितीमागची प्रेरणा बौद्धतत्त्वज्ञानाचा प्रसार हीच आहे. आध्यापन आणि लेखन करत असताना ते विश्वमंगलासाठी आहे हे त्यांनी अधोरेखित केले. 'भगवान बुद्ध' हे चरित्रही त्यांनी लिहिले. ''सामान्य लोकांना उपयोगी पडण्यासारखे बौध्द वाङ्मय देशी भाषांतून तयार करणे'' हा हेतू मनात बाळगून त्यांनी दीर्घकाल या कार्यासाठी स्वत:ला वाहून घेतले. महात्मा गांधींच्या समग्र जीवनव्यापी अहिंसेच्या शिकवणीत आणि सत्याग्रहात त्यांना समरस व्हावेसे वाटले. या प्रज्ञावंताने असहकारितेच्या आंदोलनातही भाग घेतला. उक्तीला कृतीची जोड दिली.

'हिंदी संस्कृती आणि अहिंसा' हा धर्मानंदांचा महत्त्वपूर्ण ग्रंथ होय. परिणतप्रज्ञ वयात त्यांनी हा ग्रंथ लिहिला. बाबिलोनियन, आर्य आणि दास या वंशांच्या लोकांनी जी संस्कृती निर्माण केली त्या समन्वयातून वैदिक संस्कृती कशी निर्माण झाली. तिच्यात विकास कसा झाला याचा मागोवा त्यांनी संशोधक वृत्तीने घेतलेला आहे व शेवटी ते त्यांना अभिप्रेत असलेल्या अहिंसाधर्माच्या विवेचनाकडे वळलेले आहेत. भारतीय समाजातील धार्मिक, सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरांविषयी विश्लेषण करून आधुनिक विचारप्रणालीतील समाजवाद, साम्यवाद आणि गांधीवाद यांविषयीचे मतप्रदर्शन केलेले आहे. नव्या मानवधर्माच्या प्रतिष्ठापनेची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. यात त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब आढळते. या ग्रंथाविषयी पु. मं. लाड आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हणतात:

''भारतीय संस्कृतीचा आरंभापासून इतका व्यापक आढावा घेतलेले व जागतिक संस्कृतीशी भारतीय संस्कृतीचा अनुबंध जोडणारे एवढे मूलग्राही विवेचन मराठीतच काय पण अन्य भाषांतही क्वचितच आढळेल.''

धर्मानंदांची वैचारिक जडणघडण कशी झाली, त्यांचा बुद्धिप्रामाण्यवादी मन:पिंड कसा घडला याचा प्रांजळ आणि पारदर्शी आलेख त्यांच्या 'निवेदन' या आत्मचरित्रामध्ये आढळतो. आत्मचरित्रांवरील विवेचनात हा भाग येणार असल्यामुळे त्यातील धर्मानंदांच्या या स्फुल्लिंगांकडे तेवढा अंगुलिनिर्देश करणे अगत्याचे वाटते.

१८९९ साली निघताना अनेक विचारांची नोंद त्यांनी आपल्या रोजनिशीत करून ठेवलेली आहे. स्वानुभवावर आधारलेली त्यांची ही निरीक्षणे आजच्या घडीला मार्गदर्शक ठरणारी आहेत.

"आपल्या पालकांच्या अज्ञानामुळे तुम्हांस योग्य शिक्षक न मिळाल्यामुळे तुम्ही अज्ञानी राहाल.... अज्ञानासारखी दुसरी भयंकर गोष्ट या जगात नाही म्हटले तरी चालेल."

"विद्येची आवड असून विद्या न येण्याचे मुख्य कारण म्हणजे लज्जा हे होय. मी एवढा थोर झालो, आता काय शिकणार? अशा प्रकारच्या विचारांनी आपले मन विद्येपासून मागे हटते.... विद्यादेवीच्या भक्तीत विघ्न आणणारी लज्जा ही आसुरी आहे असे समजा. सत्य व हितकारी गोष्टीत लज्जेस हात घालू देणे म्हणजे दु:ख विकत घेणे असे समजा."

जातिभेदनिर्मूलन, व्यक्ती कुटुंबविषयक व समाजविषयक कर्तव्ये कोणती या विषयीची टिपणे या रोजनिशीत आहेत. कोवळ्या तरुण वयात त्यांची विचारसरणी वाचन, चिंतन आणि मननाने प्रगल्भ झालेली होती याचे दर्शन घडते. आपल्या मर्यादांचे त्यांना पुरेपूर भान होते. पण देशहिताची कळकळही होती. अमेरिकेतील आपल्या दिनचर्येत ते म्हणतात:

"विचाराप्रमाणे कृती करून दाखविण्याचे आमचा देश हे क्षेत्र नव्हे, किंवा माझ्या अंगी सामर्थ्यही नाही, ते मी जाणून होतो. तथापि अशा विचारांनी किंवा पाहिजे तर स्वप्नांनी म्हणा- माझ्या मनाला अप्रतिम आनंद होत असे व अद्यापि हिंदुस्थानातील दारिद्र्याने पीडिलेल्या लोकांची स्थिती कशी सुधारता येईल व आमच्या मागासलेल्या देशबांधवांना शिक्षणादिकांचे फायदे कसे मिळतील, याचा विचार करणे मला अत्यंत प्रिय वाटते व क्षणभर या विचारात मी माझे शारीरिक आणि मानसिक खेद विसरून जातो."

महात्मा गांधींचा अहिंसाधर्म मान्य होता पण गतिमान युगधर्मात तो अपुरा आहे असे वाटून सत्य आणि अहिंसा या दोन यामांस अस्तेय आणि अपरिग्रह या आणखी दोन यामांची जोड देऊन ही चार चाके परस्परांना कशी पूरक आहेत यासंबंधीची नवी मांडणी त्यांनी केलेली आहे. बोधीसत्व नाटकातील बोधीसत्व या पात्राच्या तोंडी अशा आशयाची वाक्ये घातलेली आहेत.

अहिंसेला समाजवाद्यांच्या प्रज्ञेची जोड मिळाली, तरच हा प्रवाह योग्य दिशेने वळेल व मानवजातीच्या कल्याणासाठी कारणीभूत होईल असे त्यांनी 'हिंदी संस्कृती आणि अहिंसा' या ग्रंथात म्हटलेले आहे.

गोविंद नारायण माडगांवकर यांनी 'मुंबईचे वर्णन' (१८६३) हा ग्रंथ लिहिला. हे केवळ मुंबईचे स्थलवर्णन नाही. येथील नागरी जीवनाच्या सर्व अंगोपांगांची संशोधनपूर्वक सामग्री एकत्रित करुन त्यांनी परिपूर्ण दर्शन घडविले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या हा मौलिक असा दस्तऐवज आहे. मराठी भाषकांना उपयुक्त बोध व्हावा या दृष्टीने मुंबईचा इतिहास माडगांवकरांनी लिहिलेला आहे. तत्कालीन

राज्यव्यवस्था व लोकस्थिती यांची मनोरंजक माहिती त्यांनी सुलभ भाषेतून करून दिलेली आहे. मुंबईच्या उर्जितावस्थेस कारणीभूत ठरलेल्या उद्योग-व्यवसायांची माहिती पुरविली आहे. तत्कालीन मुंबईच्या समाजजीवनातील अनेक बारकावे या वर्णनाद्वारे रेखाटले गेले आहेत. येथील मानसिकतेचे वर्णन करताना ''मुंबईच्या लोकांस द्रव्याची तमा नाही.'' असे माडगांवकर म्हणतात. छापलेल्या कागदास स्पर्श करायला तेव्हा लोक कसे घाबरत असत हे त्यांनी सांगितले आहे. १८४३ साली मुंबईत रूळ टाकण्याचे काम सुरू केले आणि १६ एप्रिल १८५३ साली येथील लोहमार्गावरून आगगाडी सुरू झाली याचे वर्णन या पुस्तकात आहे. सूत गिरणी पाहून त्यांना विस्मय वाटला असे ते म्हणतात. 'समकालीन व्यक्तीने अधिकृत स्वरूपात रेखाटलेले समाजचित्र' असा 'मुंबईचे वर्णन' या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल.)

'मुंबईवर्णन' हे सर्व देशी भाषांतील पहिले स्थळवर्णनात्मक अभिजात पुस्तक आहे, असे मानले जाते. 'माडगांवकरांचे संकलित वाङमय खंड १ला' हे पुस्तक प्रा. अ. का. प्रियोळकर आणि डॉ. स. गं. मालशे यांनी संपादित केलेले आहे. अर्वाचीन कालखंडातील चार वाङ्मयसेवकांपैकी ते एक गणले जातात. पहिले सदाशिव काशिनाथ छत्रे, दुसरे बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर, तिसरे हरि केशवजी पाठारे आणि चौथे गोविंद नारायण माडगांवकर. त्यांचे बहुतांश लेखन स्वतंत्र स्वरूपाचे आहे. त्यांच्या लेखनातून तत्कालिन तरुण वर्गाच्या मानसिक स्पंदनांची चुणूक पहावयास मिळते.

''हल्ली आम्हास चाकरी करण्याचा नाद फार लागला आहे. त्यामुळे आम्हांस भित्रेपणा जडला आहे. मोठा असो किंवा गरीब असो, जो उठला तो चाकरी करावयास धावतो. जे गरीब आहेत त्यांनी चाकरी करावी हे योग्य आहे; परंतु जे श्रीमंत आहेत त्यांनी आपआपल्या मुलांस अनेक प्रकारचे धंदे शिकवावे. जेव्हा आम्हामध्ये पुष्कळ व्यापारी, देशपर्यटण करणारे, कलाकौशल्य शिकणारे व शेतीच्या कामात मन घालणारे असे लोक होतील तेव्हाच आम्हांमध्ये स्वतंत्रपणा येईल.''

त्यांचे समग्र वाङ्मय नव्या पिढीत नीती व ज्ञान यांचे संवर्धन होण्याच्या प्रेरणेने लिहिले गेले. डॉ. भाऊ दाजी, डॉ. नारायण दाजी आणि नारायण वासुदेव दाभोळकर यांनी त्यांच्या मराठी व इंग्रजी खाजगी वर्गातून मार्गदर्शन घेतले होते. 'गोविंद नारायण माडगांवकर यांचे समग्र वाङमय खंड १'मध्ये 'पत्रावळी', 'अन्न', 'मनुष्याचे आच्छादन', 'रेशमी रुमाल', 'मधाचे पोळे', 'द्रोण', 'कावळ्यांचा घरोटा', 'अचाट खाणे मसणात जाणे', 'भरत खंडातील कारीगर', 'कापूस', 'यत्नेन किं दुर्लभम्', 'मादक पदार्थ', 'बळी तो कानपिळी', 'द्रवेण सर्वे वशा:' व 'अति सर्वत्र वर्जयेत' इ. लेख आहेत. प्रामुख्याने ते 'ज्ञानप्रसारक' आणि 'ज्ञानोदय' या महत्त्वाच्या नियतकालिकांतून ते प्रसिद्ध झालेले आहेत. 'साध्याही विषयात आशय कधी मोठा

किती आढळे' याचा प्रत्यय हे लेख वाचताना पदोपदी येतो. या लेखांतील भाषाशैली सुलभ आणि प्रवाही आहे. बोधवादी दृष्टिकोन असूनही तो कुठेही खुपत नाही. तत्कालीन गद्याचे नितांत प्रसन्न रूप यात अनुभवायला मिळते. 'आत्मशिक्षण', 'स्वभाषा प्रज्वलित ठेवावी', 'ज्ञानप्रसारक सभेची सभासदांस विनंती' व 'आम्हांमध्ये स्वतंत्रपणा कधी येईल?' या लेखांचे स्वरूप पूर्णत: वैचारिक आहे.

"स्वभाषा चांगली आल्याशिवाय परभाषेचे मर्म समजणे कठीणच आहे. पाहा, कित्येक कल्पना आम्हांस स्वभाषेतच स्पष्ट करून दाखविण्यास किती कठीण पडते. तर ज्या कल्पनांचा उद्‌भव स्वभाषेत झाला त्यांचा परभाषेच्या तारतम्याने त्यांस उघड करुन सांगणे किती दुर्घट पडेल याचा तुम्ही विचार करा." (स्वभाषा प्रज्वलित ठेवा)

दीडशे वर्षांपूर्वीचे त्यांचे हे विचार आजच्या परिस्थितीला लागू पडणारे आणि आपणास अंतर्मुख करणारे आहेत. मराठी निबंधाचे माडगांवकर हे आघाडीचे शिल्पकार याचा प्रत्यय या निबंधातून येतो. व्युत्पन्नता आणि रसज्ञता यांचा स्वरमेळ या भाषाशैलीत आढळतो.

'भारतमित्र'चे संपादक आणि सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक ना. भा. नायक यांनी ऋषीवन (रिवण) येथे राहून प्रदीर्घ काळ खडतर परिस्थितीशी झुंज देत 'भारतमित्र' हे नियतकालिक नियमितपणे चालविले. या नियतकालिकाने ५४ वर्षे पूर्ण केली. विजनवासात राहून त्यांनी अखंडपणे ज्ञानसाधना केली. त्यांच्या नावावर छोटी-मोठी ५१ पुस्तके आहेत. गोव्यातील सामाजिक स्थित्यंतरे, गोमंतकाची लष्करी परंपरा, गोव्यातील अनेक राजवटी, गोव्यातील आयुर्वेदिक परंपरा, गोव्याची व्यापारी परंपरा, विविध क्षेत्रांतील गोमंतकीय महनीय व्यक्ती व गोव्याचा पूर्वेतिहास इ. विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले. इतिहाससंशोधन हा त्यांचा ध्यासाचा आणि अभ्यासाचा विषय असल्यामुळे प्रामुख्याने त्यांचे लेखन त्या अंगाने जाणारे असल्यामुळे या आढाव्यामध्ये त्यांच्या लेखनाचा समावेश केलेला नाही. पण एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे की टिळक-आगरकरांची परंपरा डोळसपणे अभ्यासलेले, 'भारत'कारांच्या कार्याशी निगडित असलेले विसाव्या शतकातील गोव्यातील प्रबोधनकालाचे दीर्घकाळ साक्षीदार असलेले ते विचारवंत आहेत. त्यांच्या राष्ट्रवादीपिंडधर्माचे आणि संस्कृतिनिष्ठेचे प्रकटीकरण विविधांगी लेखनातून झालेले आहे.

या काळात शांबाराव सरदेसाई यांनीही विपुल स्वरूपात वृतपत्रीय वैचारिक वाङ्मय निर्माण केले. समाजात सुधारणा घडवून आणणारे बुद्धिवादी विचारवंत म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांनी काही पुस्तिका लिहून ख्रिश्चन धर्मांच्या आक्रमणाला पायबंद घातला. ते मराठीचे पुरस्कर्ते होते आणि उत्तम वक्ते म्हणूनही प्रसिद्ध होते. त्यांची वाङ्मयीन विषयांवरची वाख्याने विचारप्रवर्तक होत.



शांबाराव सरदेसाई

त्यांच्या नावावर ग्रंथलेखन नसले तरी कांही पुस्तिका प्रसिद्ध आहेत. गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. त्यावेळचे त्यांचे भाषण शैलीदार आहे आणि विचारप्रवर्तक आहे.

मुक्तिपूर्व कालखंडात मुंबईत राहून अनेक गोमंतकीयांनी मराठीतून ललित वाङमयाची व वैचारिक वाङमयाची निर्मिती करून कीर्ती संपादन केली. त्यांतील डॉ. भाऊ दाजी लाड हे अग्रगण्य नाव आहे. गोविंद नारायण माडगांवकर, माधव चंद्रोबा डुकले, डॉ. नारायण दाजी, ग. वि. लाड ('महाराष्ट्र सारस्वता' चे संपादक) न्यायशास्त्री सुखठणकर यांचे वाङ्मयकर्तृत्व मौलिक स्वरूपाचे आहे.

ख्यातनाम साहित्यसंशोधक प्रा. अ. का. प्रियोळकर यांच्या संशोधनकार्याचे स्वरूप पाहाता त्यांच्या प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे क्षितिज किती व्यापक होते हे लक्षात येते. गोमंतकातील ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केलेल्या मराठी भाषेच्या संवर्धनाचे कार्य हा त्यांच्या संशोधनाचा खास विषय असला तरी भाषाविज्ञान, व्याकरण, भाषाकारण, धर्मसमीक्षण सभा, भारतातील मुद्रणालये, मराठी दोलामुद्रिते इ. विषयांवरील अथक प्रयत्नांनी साकार केलेली ग्रंथसंपदा पाहून त्यांच्या ज्ञाननिष्ठ वृत्तीसमोर आपण नतमस्तक होतो. ज्ञानक्षेत्रात त्यांनी मौलिक भर घातली. 'ना मूलं लिख्यते किंचित' हा त्यांच्या संशोधन प्रक्रियेतील बीजमंत्र होता. 'गोविंद नारायण माडगावकर : व्यक्ती व वाङमय' 'डॉक्टर भाऊ दाजी : व्यक्ती, काल आणि कर्तृत्व', रावबहादूर दादोबा पांडुरंग: आत्मचरित्र व चरित्र, 'लोकहितवादी निबंधसंग्रह (गोपाळराव हरी देशमुख. व्यक्ती, वाङ्मय व विचार या निबंधासह)' हे त्यांचे चरित्रपर ग्रंथ आहेत. शिवाय त्यांनी माधव चंद्रोबा, बाळशास्त्री जांभेकर, 'निबंधमाला'कार विष्णुशास्त्री चिपळूणकर, नारायण दीनानाथ वेलकर, प्रो. पां. दा. गुणे, रामचंद्र भिकाजी गुंजीकर (चरित्र व वाङ्मयकार्य) इ. चरित्रपर लेख लिहिले आहेत. 'मुंबईचा मराठी वारसा', 'मुंबई नगर संशोधन', 'मुंबईतील पाश्चात्य वैद्यविद्येची शंभरी', 'मुंबईतील मराठी आणि गुजराती', 'मुंबईचा प्रतिनिधी पाहुणा', 'गोमंतकीयांचे मुंबईच्या रचनेतील कार्य' व Goan pioneers in Bombay इ. मुंबईविषयीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे लेख त्यांनी लिहिले. त्यांच्या या सर्व प्रकारच्या लेखनातून सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङमयीन स्थितिगतीसह, काळाचा पट उभा राहतो. या लेखनामागे जाज्वल्य मनोवृत्ती आणि ध्येयनिष्ठा आहे. वैचारिक वारशाचे स्मरण करून देण्याची तळमळ आहे.

## संदर्भ साहित्य


१. गेल्या पावशतकातील गोमंतक, संग्राहक- केशव अनंत नायक, सारस्वत ब्राह्मण समाज, मडगाव, जानेवारी १९३८.

२. कै. यशवंतराव सूर्यराव सरदेसाई (भाई देसाई) स्मारक ग्रंथ (भाई देसाई यांचे लिखाण व त्रोटक चरित्र)- कै. यशवंतराव सूर्यराव सरदेसाई (भाई देसाई) स्मारक समिती, मुंबई, १९६५.

३. धर्मानंद, आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे आत्मचरित्र आणि चरित्र- संपादक आणि चरित्र लेखक : जगन्नाथ सदाशिव सुखठणकर, थि गोवा हिंदु असोशिएशन, मुंबई, १९७६.

४. गोमंतक मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षीय व स्वागताध्यक्षीय भाषणे, गोमंतक मराठी अकादमी, पणजी, एप्रिल १९९२.

५. 'भारत'कार हेगडे-देसाई यांचे निवडक अग्रलेख, खंड १, संपादक, शशिकांत नार्वेकर, संपादन सहाय्य आणि परिपूर्ती: प्रा. रवींद्र घवी, पणजी, गोवा, १९९९.

६. 'भारत'कार हेगडे देसाई यांचे निवडक अग्रलेख, खंड २, संपादक : शशिकांत नार्वेकर, संपादन सहाय्य आणि परिपूर्ती: प्रा. रवींद्र घवी आणि परेश प्रभू, गो. म. अ. पणजी, गोवा, नोव्हे. २००१.

७. मुंबईचे वर्णन- गोविंद नारायण माडगावकर, तिसरी आवृत्ती, वरदा बुक्स, पुणे, १९९२.

८. माडगांवकरांचे संकलित वाङ्मय, खंड १ला- गोविंद नारायण माडगावकर संपादक प्रा. अ. का. प्रियोळकर, डॉ. स. गं. मालशे, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६८.


●●●